# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** प्रभाग क्र. २९ विनायक नगर येथील श्री विनायक पाटील,
**{सा.बां.वि. झोन क्र. ०३}** विनायक नगर यांचे घरामागील पडलेल्या नाल्याची सुरक्षा भिंत करण्याच्या कामास्तव रु. २८,३९,५९२/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. A42001374612 अंतर्गत तरतुद मुक्त करुन या कामाची रितसर निविदा बोलविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप :—**

१. प्रस्तुत कामाकरिता सन २०२२—२३ चे आय व्ययकातील पद क्र. A42001374612 अंतर्गत खर्च प्रस्तावित आहे.

२. सदर प्रस्तावास मा. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, यांचे आदेश क्र. T.S./34/ SE(PHE) 2020-21 दि. ८.११.२०२१

३. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 186/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 08/12/2022

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हनुमाननगर झोन क्र. ०३ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. २९ विनायक नगर येथील श्री विनायक पाटील, विनायक नगर यांचे घरामागील पडलेल्या नाल्याची सुरक्षा भिंत करण्याच्या कामास्तव रु. २८,३९,५९२/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. A42001374612 अंतर्गत तरतुद मुक्त करुन या कामाची रितसर निविदा बोलविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**